PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Jamla Ho Jamla
Year: 1995

Song: Lapun Chapun Jara Japun
Lyricist: Shantaram Nandgaonkar

लपून छपून जरा जपून
इश्काचं खेळावं
मैदान सोडून जानाऱ्याला
कुणी कसं बोलावं
ऐन येळंला आले मी
साज नवतीचा ल्याले मी
ऐन येळंला आले मी
साज नवतीचा ल्याले मी
अंग अंगी मदन हा फिरला
आज खेळाला रंग भरला
हो आज खेळाला रंग भरला
आली आली चतुर कामिना
करते खानाखुना हे टकमक बाई
कुणी जितला कुनी हरला
कुणी जितला कुनी हरला

सोळा शिणगाराचा कायदा केला असा
भेट घडवायचा वायदा केला असा
सोळा शिणगाराचा कायदा केला असा
भेट घडवायचा वायदा केला असा
लाडी गोडी मदी छेडा छेडी मदी
लाडी गोडी मदी छेडा छेडी मदी
कुणी लाजचा पडदा धरला
आज खेळाला रंग भरला
हो आज खेळाला रंग भरला
आली आली चतुर कामिना
करते खानाखुना हे टकमक बाई
कुणी जितला कुनी हरला
कुणी जितला कुनी हरला

लई नवसानं गं योग आला जुळून
लई नवसानं गं योग आला जुळून
इंद्र दरबार गं कसा आला फुलून
इंद्र दरबार गं कसा आला फुलून
अशी करते अदा कैक झालं फिदा
अशी करते अदा कैक झालं फिदा
कुणी येडा बघून मनी झुरला
आज खेळाला रंग भरला
हा आज खेळाला रंग भरला
आली आली चतुर कामिना
करते खानाखुना हे टकमक बाई
कुणी जितला कुनी हरला
कुणी जितला कुनी हरला

हो... आज न्यारी लहर
आज न्यारा बहर
सारा पडला विसर असा झाला कहर
आज न्यारी लहर आज न्यारा बहर
सारा पडला विसर असा झाला कहर
काळजाच्या कुपित
आज लपल गुपित
काळजाच्या कुपित
आज लपल गुपित
डाव अर्ध्यावरी आज उरला

Literacy for a Billion

आज खेळाला रंग भरला
हा आज खेळाला रंग भरला
आली आली चतुर कामिना

करते खानाखुना हे टकमक बाई
कुणी जितला कुनी हरला
कुणी जितला कुनी हरला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*